**CNR :- MHSI100002622021**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३३/२०२१ :–

## –: निशाणी २० वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादीचे कायदेशीर वारसांना दाव्यात व दावा नोंदवहीमध्ये दुरुस्ती करुन सामील करणेस परवानगी मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी श्री. परशुराम अर्जुन दळवी हे दि.१०.१२.२०२१ रोजी गाव मौजे तळेखोल, ता. दोडामार्ग येथे मयत झाले असून त्यांना खालीलप्रमाणे कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादीचे नावासमोर मयत असा शब्द लिहून खालीलप्रमाणे कायदेशीर वारसांची नावे लिहीण्यात यावी.

| | |
|---|---|
| प्रतिवादी क्र. १अ) | श्रीम. अमिता परशुराम दळवी,<br>वय सु. ५६ वर्षे, धंदा – घरकाम, |
| प्रतिवादी क्र. १ब) | श्री. नकुल परशुराम दळवी,<br>वय सु. ३० वर्षे, धंदा – नोकरी, |
| प्रतिवादी क्र. १क) | श्रीम. मंगल पांडुरंग ठाणेकर,<br>(पुर्वाश्रमीची भीमा परशुराम दळवी)<br>वय सु. ३५ वर्षे, धंदा – घरकाम, |
| प्रतिवादी क्र. १ड) | श्रीम. साची शाम गवस,<br>(पुर्वाश्रमीची वैशाली परशुराम दळवी)<br>वय सु. ३३ वर्षे, धंदा – घरकाम, |
| प्रतिवादी क्र. १इ) | कु. कस्तुरी परशुराम दळवी,<br>वय सु. २८ वर्षे, धंदा – घरकाम,<br>सर्व रा. तळेखोल, ता. दोडामार्ग,<br>जि. सिंधुदुर्ग, पिन. ४१६५१२. |

वरील प्रमाणे प्रतिवादी यास वारस आहेत. याकामी प्रतिवादीचे वारस मुदतीत दाखल करावयाचे होते. परंतु, कोरोना महामारीमुळे व मृत्यूचा दाखला वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे तसेच वादी हा नोकरी निमित्त गोवा येथे जात असल्या कारणाने प्रस्तुतचा अर्ज मुदतीत दाखल करता आला नाही. उपरोक्त दुरुस्तीमुहे दाव्याच्या गुणदोषावर, कोर्ट फी आकारात कोणताही बदल होत नाही. सदरचे वारस अभिलेखासदरी सामील करुन तशी दाव्यात व दावा नोंदवहीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादीचे वारसांतर्फे म्हणणे देण्यात आले. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने दाखल केलेला अर्ज खोटा व खोडसाळ असून प्रदीर्घ विलंबाने दाखल केलेला आहे. तसेच सदर अर्जासोबत वादीने प्रतिवादी यांचा मृत्यूचा दाखला देखील हजर केलेला नाही. सबब वादीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती प्रतिवादीचे वारसांनी केलेली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीस खालीलप्रमाणे वारस आहेत.

**प्रतिवादी १ – श्री. परशुराम अर्जुन दळवी (मयत वारस)**
**प्रतिवादी क्र. १अ) श्रीम. अमिता परशुराम दळवी,**
**वय सु. ५६ वर्षे, धंदा – घरकाम,**
**प्रतिवादी क्र. १ब) श्री. नकुल परशुराम दळवी,**
**वय सु. ३० वर्षे, धंदा – नोकरी,**

**प्रतिवादी क्र. १क) श्रीम. मंगल पांडुरंग ठाणेकर,**
**(पुर्वाश्रमीची भीमा परशुराम दळवी)**
**वय सु. ३५ वर्षे, धंदा – घरकाम,**
**प्रतिवादी क्र. १ड) श्रीम. साची शाम गवस,**
**(पुर्वाश्रमीची वैशाली परशुराम दळवी)**
**वय सु. ३३ वर्षे, धंदा – घरकाम,**
**प्रतिवादी क्र. १इ) कु. कस्तुरी परशुराम दळवी,**
**वय सु. २८ वर्षे, धंदा – घरकाम,**
**सर्व रा. तळेखोल, ता. दोडामार्ग,**
**जि. सिंधुदुर्ग, पिन. ४१६५१२.**

०६. दाव्याचे स्वरुप पाहता मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणण्यास विलंब केलेला आहे. विलंबाचे दिलेले कारण संयुक्तीक व समाधानकारक नाही. परंतु, केवळ विलंब झाला म्हणुन प्रतिवादीचे वारस अभिलेखावर सादर करण्याची उचित संधी नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरोधी होणार आहे. अर्ज नामंजूर केल्यास अर्जाच्या अनुषंगाने करावी लागणारी विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी झालेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करणे मला उचित वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**–:: आदेश ::–**

१. न्यायाचे कारणे रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन निशाणी २० वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कसुरीशिवाय सदर खर्चाची रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे मात्र) भरुन; प्रतिवादी क्र. १ चे वारसांना प्रस्तुत अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यात समाविष्ट केल्यावर तशी दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत हजर करावयाची आहे.

३. सदरची खर्चाची रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे मात्र) मोफत विधीसेवा प्राधिकरण (Free Legal Aid) कडे जमा करणेत यावी.

४. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने रद्द झाला असे समजण्यात यावे.

Digitally signed by YASHODHAN PRADIP BAVKAR
Date: 2023.04.12 16:04:07 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – १२.०४.२०२३ दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)

दोडामार्ग.